भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सहयोगीत

# ग्रामिण कृषि मौसम सेवा

उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला पत्रक - सिंधुदुर्ग

## कालावधी (दिनांक १०.१०.२०२० ते १४.१०.२०२०)

| अंक ८०/२०२० | | | | | | | दिनांक ०९.१०.२०२० | | कालावधी ५ दिवस | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मागील आठवड्यातील हवामान घटकांची प्रत्यक्ष नोंद (०२/१०/२०२० ते ०८/१०/२०२० पर्यंत) | | | | | | | हवामानाचे घटक | | पुढील पाच दिवसांचे हवामान घटकांचे पूर्वानुमान (वैधता १०/१०/२०२० ते १४/१०/२०२० पर्यंत) | | | | |
| ०२/१० | ०३/१० | ०४/१० | ०५/१० | ०६/१० | ०७/१० | ०८/१० | दिनांक | | १०/१० | ११/१० | १२/१० | १३/१० | १४/१० |
| १८.३ | १०.६ | ६.५ | ८.४ | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मि. मी) | | ७ | ७ | १२ | ६ | १६ |
| ३३.० | ३३.० | ३३.० | ३३.० | ३३.० | ३३.० | ३५.० | कमाल तापमान (अं. से) | | ३५ | ३४ | ३४ | ३३ | ३३ |
| २४.० | २२.० | २३.० | २३.० | २२.० | २३.० | २३.० | किमान तापमान (अं. से) | | २५ | २५ | २५ | २६ | २६ |
| निरभ्र | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | सकाळ | मेघाच्छादन (ऑक्टा.) | ३ | ७ | ८ | ८ | ८ |
| ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | दुपार | | | | | | |
| ९६ | ९५ | ९२ | ९३ | ९६ | ९८ | ९८ | सकाळची सापेक्ष आर्द्रता(%) | | ९२ | ९४ | ९५ | ९३ | ९४ |
| ६० | ६७ | ६७ | ७८ | ७३ | ७१ | ६२ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | | ६५ | ६९ | ८२ | ८६ | ७७ |
| ०.२ | ०.२ | ०.२ | ०.२ | ०.० | ०.४ | ०.३ | वा-याचा वेग (कि.मी/तास) | | ००४ | ००५ | ००४ | ००५ | ००४ |
| स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | सकाळ | वा-याची दिशा | आग्नेय कडे | आग्नेय कडे | दक्षिणोत्तर/ नैऋत्ये कडे | दक्षिणे कडे | दक्षिणे कडे |
| स्थिर | पश्चिमोत्तर/ नैऋत्य कडे | स्थिर | पश्चिमोत्तर/ नैऋत्य कडे | पश्चिमोत्तर/ नैऋत्य कडे | स्थिर | पश्चिमोत्तर/ वायव्ये कडे | दुपार | | | | | | |

| मागील वर्षातील (२०१९) पर्जन्य (मि. मी) | १/०१/२०२० पासूनचे पर्जन्य (मि. मी)न्य | १/०६/२०२० पासूनचे पर्जन्य (मि. मी) | मागील आठवड्यातील पर्जन्य (मि.मी) |
|---|---|---|---|
| ४५९१.० | ४५५४.४ | ४५५१.२ | ४३.८ |

| | |
|---|---|
| पुढील ५ दिवसाच्या हवामानाची सामान्य स्थिती | सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये पुढील पाच दिवसामध्ये दिनांक १० ते १४ ऑक्टोबर, २०२० या कालावधी दरम्यान दिनांक १० व ११ ऑक्टोबर रोजी तुरळक ठिकाणी हलक्या, दिनांक १२ ऑक्टोबर रोजी काही ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या तर दिनांक १३ व १४ ऑक्टोबर रोजी ब-याच ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता आहे. त्याचबरोबर तापमानात काही अंशी वाढ होऊन हवामान आर्द्र व मुख्यत्वे ढगाळ राहण्याची शक्यता आहे. असा अंदाज प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांच्याकडून वर्तविण्यात आला आहे. |
| इशारा | सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये दिनांक १० ते १२ ऑक्टोबर या कालावधी दरम्यान तुरळक ठिकाणी सोसाट्याचा वारा, विजांचा लखलखाट व मेघगर्जनेसह हलक्या स्वरुपाच्या पाऊसाची तर दिनांक १३ व १४ ऑक्टोबर रोजी तुरळक ठिकाणी सोसाट्याचा वारा, विजांचा लखलखाट व मेघगर्जनेसह मुसळधार पाऊसाची शक्यता वर्तविण्यात आलेली आहे. |
| सर्वसाधारण कृषि सल्ला | दिनांक १० ते १४ ऑक्टोबर रोजी सोसाट्याचा वारा, विजांचा लखलखाट व मेघगर्जनेसह काही ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता असल्याने विजांच्या बचावापासुन शेतक-यांनी शेतामध्ये कामे करताना सावधानता बाळगावी. तसेच चारावयास सोडलेल्या दुभत्या जनावरांचे विजापासुन संरक्षण करण्यासाठी दुभती जनावरे सुरक्षित ठिकाणी बांधावी. |
| संक्षिप्त संदेश सल्ला | येत्या ५ दिवसांमध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्यात मेघगर्जनेसह वादळी पाऊसाची शक्यता लक्षात घेता कापणी व मळणी केलेल्या शेतमालाची सुरक्षित ठिकाणी साठवणुक करावी. |

### हवामान अंदाजावर आधारीत कृषि सल्ला

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात | हळव्या जातीः- कापणी<br><br>निम गरव्या व गरव्या जातीः- फुलोरा ते दाणे भरणे | गेल्या आठवड्यामध्ये हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस होता तसेच पुढील पाच दिवसांमध्ये हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे.<br>सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये दिनांक १३ व १४ ऑक्टोबर रोजी तुरळक ठिकाणी सोसाट्याचा वारा, विजांचा लखलखाट व मेघगर्जनेसह मुसळधार पाऊसाची शक्यता असल्यामुळे या दोन दिवशी शक्यतो भात पिकाची कापणी करु नये. तसेच येत्या ३ दिवसात भात कापणी पाउसाचा अंदाज पाहुनच करावी.<br>पुढील ३ दिवसांमध्ये अत्यंत हलक्या पाऊसाची शक्यता लक्षात घेता कापणीस तयार झालेल्या हळव्या भात जातींची कापणी सुरु करावी.<br>हळव्या भात जाती काढणीयोग्य झाल्या असल्यास कापणी पुर्वी ८ ते १० दिवस खाचरातील पाणी काढुन देण्याची व्यवस्था करण्यात यावी. कापणी करण्याच्या ८ दिवस अगोदर भातावर कोणतेही किटकनाशक/बुरशीनाशक फवारु नये वा धुरळणी करु नये.<br>काही ठिकाणी हळव्या भाताच्या जाती कापणीसाठी तयार झालेल्या आहेत. ज्या ठिकाणी भात पिक काढणीस तयार झाले असेल त्याठिकाणचे भात सकाळ ते दुपार या वेळेत जमिनीलगत कापुन घ्यावे.<br>कापणी केलेल्या भात पिकाची लागोलाग मळणी/झोडणी करुन धान्य कोरड्या आणि सुरक्षित ठिकाणी वाळवण्यास ठेवावेत.<br>भात कापणीसाठी विद्यापीठाने विकसीत केलेल्या वैभव विळ्याचा वापर करावा जेणेकरुन भात जमिनीलगत कापले जाईल.<br>भात पिकाची मळणी/झोडणी केल्यानंतर पिकाच्या पेंढ्या सुरक्षित ठिकाणी ठेवण्याची व्यवस्था करावी. जेणेकरुन त्या पेंढ्या पावसात भिजणार नाहीत व जनावरांस चांगल्या चा-याची उपलब्धता होईल.<br>जिल्ह्यामध्ये गरव्या जाती फुलोरा ते दाणे भरण्याच्या अवस्थेत आहेत. अशा ठिकाणी पाण्याची पातळी ५ ते १० से.मी. राखावी.<br>जिल्ह्यामध्ये गरव्या भात जाती फुलोरा अवस्थेत आहेत अशा ठिकाणी पीकास नत्र खताची तिसरी मात्रा (435 ग्रॅम युरीया प्रति गुंठा क्षेत्र) पीक फुलोरा अवस्थेत असताना पाऊसाचा अंदाज बघुन दयावी. |
| नागली | फुलोरा | हवामान अंदाजानुसार दिनांक १० ते १२ ऑक्टोबर, २०२० या दरम्यान हलक्या स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता असल्याने कापणीस तयार झालेल्या हळव्या नागली पिकाची कणसे सकाळच्या वेळेस विळ्याने कापुन कोरड्या आणि सुरक्षित ठिकाणी वाळविण्यासाठि पसरवुन |

| | | |
|---|---|---|
| | | ठेवावे आणि वाळविल्यानंतर त्याची मळणी करुन घ्यावी. |
| भुईमुग | फुलोरा ते आरा अवस्था | भुईमुग पिक काही ठिकाणी फुलोरा अवस्थेत असुन हळव्या जाती आरा अवस्थेत आहेत. तरी भुईमुगाच्या पिकावरुन रिकामे पिंप फिरवल्याने जमिनीत घुसणा-या आ-यांची परिणामतः शेंगांची संख्या वाढल्याने भुईमुगाचे ऊत्पन्न वाढते.<br>काही ठिकाणी भुईमुग पीक आरे बाहेर येण्याच्या अवस्थेत आहे. त्याची योग्य ती काळजी घ्यावी. पीकावर मावा किडीचा प्रादुर्भाव आढळून आल्यास त्याच्या नियंत्रणासाठी डायमिथोएट हे किटकनाशक 10 मिली प्रती 10 ली. पाणी या प्रमाणत मिसळून फवारणी करावी.<br>भुईमुगावर टिक्का रोगाचा प्रादुर्भाव आढळून आल्यास नियंत्रणासाठी कार्बेडॅझिम 10 ग्रॅम किंवा डायथेन एम-45 20 ग्रॅम प्रती 10 ली पाण्यातुन फवारावे. |
| आंबा | नवीन पालवी | पॅक्लोब्युट्राझॉल (कल्टार) दिलेल्या झाडांचे बुंधे व त्याभोवतालचा भाग बेणणी करुन अथवा ग्रामोक्झोन हे तणनाशक फवारुन तणविरहीत ठेवावेत.<br>पावसाची उघडझाप, तापमानातील वाढ तसेच ढगाळ वातावरणामुळे आंब्यामध्ये नवीन पालवी आली असल्यास त्या पालवीचे तुडतुडे, शेंडा पोखरणारी अळी, पाने पोखरणारी अळी आणि मिजमाशीपासून अवश्यकतेनुसार संरक्षण करावे. त्यासाठी 25 टक्के प्रवाही डायमिथोएट 12 मिली किंवा 36 टक्के प्रवाही मानोक्रोटोफॉस 11 मिली प्रति 10 लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघडीप पाहून फवारणी करावी.<br>पावसाची उघडझाप, तापमानातील वाढ तसेच ढगाळ वातावरणामुळे नविन लागवड केलेल्या आंबा कलमांवर करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसुन आल्यास नियंत्रणासाठी नविन येणा-या पालवीवर आवश्यकतेनुसार प्रोपीनेब ०.२% (२० ग्रॅम/१० लि. पाणी) किंवा थायफिनेट मिथील ०.१% (१० ग्रॅम/१० लि. पाणी) किंवा कार्बनडॅन्झिम ०.१% (१० ग्रॅम/१० लि. पाणी) यापैकी एका बुरशीनाशकाची आवश्यकतेनुसार फवारणी करावी.<br>आंब्यावरील फांदेमर रोगाच्या नियंत्रणासाठी कॉपर ऑक्सीक्लोराइड 0.3 टक्के (30 ग्रॅम/10 ली पाणी) किंवा 0.1 टक्के बोर्डो मिश्रण यापैकी एका बुरशीनाशकाची पावसाची उघडीप पाहून फवारणी करावी. फांदेमर रोगाने मोठया फांद्यांमधून डिंक येत असल्यास रोगग्रस्त साल तासून त्याठिकाणी बोर्डो मिश्रणाची पेस्ट किंवा कॉपर ऑक्सीक्लोराइडची पेस्ट लावावी.<br>आंब्यामध्ये रोगट व सुकलेल्या फांदया, बांडगुळे कापून घ्यावीत व त्या ठिकाणी 1 टक्का बोर्डो मिश्रण लावावे.<br>फवारणीच्यावेळी किटकनाशक/बुरशीनाशक द्रावणामध्ये स्टीकर सारखा चिकट पदार्थ 1 मिली/1 लि. पाणी याप्रमाणात मिसळावा. |
| काजु | - | मोठया काजू बागेमध्ये वाढलेले झाडे झुडपे व तण काढून बागेची स्वच्छता करून घ्यावी.<br>जिल्ह्यामध्ये काजु बागांना नविन पालवी येत असुन पावसाची उघडझाप, तापमानातील वाढ तसेच ढगाळ वातावरणामुळे काजु बागायतदारांनी ढेकण्या किडीच्या प्रादुर्भाव होवू नये म्हणुन जागरुक रहावे, प्रादुर्भाव आढ्ळुन आल्यास नियंत्रणासाठी प्रवाही मोनोक्रोटोफॉस ३६% १५ मि.ली. किंवा लम्बडा सायहॅलोथ्रिन ५% ६ मि.ली. १० लिटर पाण्यातुन फवारावे.<br>काजुवर खोड्किडा (रोठा) या किडिचा प्रादुर्भाव आढ्ळुन आल्यास १५ मि.मी. पटाशिच्या सहाय्याने प्रादुर्भित साल काढून झाडातील रोठ्याला बाहेर काढून मारुन टाकावे व तो भाग ५% प्रवाही फिप्रोनील २ मी. लि. प्रति १ लिटर पाण्यामध्ये मिसळून चांगला भिजवावा.<br>काजुमध्ये काढणीनंतर जुन्या व रोगट फांद्या कापून त्या ठीकाणी १% बोर्डोमिश्रन लावावे.<br>काजुवरील फांदेमर रोगाच्या नियंत्रणासाठी फांद्या कट करुन त्यावर 1 टक्का बोर्डोपेस्ट लावावी. पाऊस संपल्यानंतर १ टक्का बोर्डो मिश्रणाची फवारणी संपुर्ण बागेत करावी.<br>फवारणीच्यावेळी किटकनाशक/बुरशीनाशक द्रावणामध्ये स्टीकर सारखा चिकट पदार्थ 1 मिली/1 लि. पाणी याप्रमाणात मिसळावा. |
| नारळ | फळ विकास | तापमान वाढ संभवत असल्यामुळे नवीन लागवड केलेल्या नारळाच्या रोपांची पाने करपु नये म्हनुन पहिली २ वर्षे रोपांना शेडनेटच्या सहाय्याने सावली तयार करावी. |
| सुपारी | फळ विकास | तापमान वाढ संभवत असल्यामुळे नवीन लागवड केलेल्या सुपारीच्या रोपांची पाने करपु नये म्हनुन पहिली २ वर्षे रोपांना शेडनेटच्या सहाय्याने सावली तयार करावी.<br>सुपारीवरील फळगळ या रोगाच्या नियंत्रणासाठी बागेमध्ये 1 टक्का बोर्डोमिश्रणाची फवारणी करावी. |
| भाजीपाला | फळ धारणा | नवीन वेलींचे पाने खाणारी अळी, मावा इ. कीडींपासुन संरक्षण करावे. वेलींचे पाने खाणारी अळी, मावा इ. कीडींपासुन संरक्षण करण्यासाठी मॅलॅथिऑन २ मि.ली. किंवा डायमिथोएट १.५ मि.ली. प्रती लीटर पाण्यात मिसळुन १०-१५ दिवसांच्या अंतराने फवारणी करावी. |
| दुभती जनावरे, शेळया | - | दिनांक १० ते १४ ऑक्टोबर रोजी सोसाट्याचा वारा, विजांचा लखलखाट व मेघगर्जनेसह काही ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता असल्याने विजांच्या बचावापासुन शेतक-यांनी शेतामध्ये कामे करताना सावधानता बाळगावी. तसेच चारावयास सोडलेल्या दुभत्या जनावरांचे विजापासुन संरक्षण करण्यासाठी दुभती जनावरे सुरक्षित ठिकाणी बांधावी. |

सदर कृषि सल्ला पत्रिका ही डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या, प्रादेशीक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले व उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे येथील "ग्रामीण कृषि मौसम सेवा" योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.


| | |
|---|---|
| डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर<br>सहयोगी अधिष्ठाता तथा नोडल ओफिसर<br>कृषी हवामानशास्त्रीय क्षेत्र एकक<br>ग्रामिण कृषि मौसम सेवा<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>०२३६२-२४४२३१ | डॉ. यशवंत चं. मुठाळ<br>तांत्रिक अधिकारी<br>कृषी हवामानशास्त्रीय क्षेत्र एकक<br>ग्रामिण कृषि मौसम सेवा<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>०२३६२-२४४२३१ |